MHKO100006132013

## आदेश निशाणी क्र.७४

प्रतिवादी क्र. ६ ने दिवाणी प्रक्रिया संहिता नियम १५१ प्रमाणे उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेबाबत केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी ३९ लगत त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. सदर कैफियतीमधील मजकूर व कलम १२ मधील विनंती पाहता त्यांनी वादीचा दावा मंजूर करण्यात यावा व वादीच्या दाव्यातील सर्व मजकूर कबूल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची वादीशी संगनमत असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. ४ ते ८ तसेच प्रतिवादी क्र. ९ ते १३ यांनी त्यांच्या वेगवेगळया कैफियती अनुक्रमे निशाणी ३४, निशाणी ५९ व निशाणी ७१ लगत दाखल केल्या आहेत. वादीने निशाणी ३६ लगत त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचा प्रथम उलटतपास घेणे कायदयाने आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदीप्रमाणे तसेच भारतीय पुरावा कायदयातील तरतुदीप्रमाणे जे प्रतिवादी गंभीरपणे वादीचे केसला विरोध करत नाहीत व वादीशी संगनमत करीत आहेत त्यांनी प्रथम वादीचा उलटतपास घेणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. वादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज चुकीचा व बेकायदेशीर आहे. कायदयाने अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. प्रतिवादी हे आपला बचाव करणेस संधी मिळावी या हेतूने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब तो फेटाळणेत यावा.

**३.** अर्ज व त्यावर वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी ३९ लगत त्यांची कैफियत दाखल केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी उलटतपास घेण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना वादीचा प्रथम उलटतपास घेण्यास आदेशित करण्यात येते.

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.07.16
13:33:35 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १५/०७/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज